**स्मरणपत्र-१ - ईमेलद्वारे**

दूरध्वनी क्र. ०२२-२४९२७६३१ / २४९४३७६४
ई-मेल – dmainfo5@gmail.com
संकेतस्थळ-https://mahadma.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र शासन**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.

**क्रमांक.** नपप्रसं/सं.मु-आस्था/गट-अ-ब/गो.अ./महापार प्रणाली/२०१८/कक्ष-२/1352    दिनांक : ८/७/२०२०.

09 JUL 2020

प्रति,
सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद प्रशासन.

**विषय :- मुख्याधिकारी,गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यांकन अहवाल Mahapar प्रणालीत Online पध्दतीने लिहिण्याबाबत.**

**संदर्भः-** १) शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक:सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/तेरा, दि.१५/१२/२०१७.
२) संचालनालयाचे पत्र क्र.नपप्रसं/कक्ष-५/गो.अ./मु.अ/२०१८/२६१८, दि.१३/८/२०१८.
३) संचालनालय समक्रमांकाचे पत्र जावक क्र.३३६९, दि.५/११/२०१९.

**महोदय,**

शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक: सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/तेरा, दि.१५/१२/२०१७ अन्वये सन २०१७-१८ पासुन गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यांकन अहवाल Mahapar प्रणालीत Online पध्दतीने लिहिण्याकरीता समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती व EMD (Employee Master Data) तयार करणेबाबत परिपत्रकातील सुचनेनूसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल परिपूर्ण माहितीसह पाठविण्यात यावा असे शासनाचे निर्देश आहेत. **(सोबत प्रत)**

त्याअनुषंगाने संदर्भाधीन क्र.२ येथील संचालनालयाचे पत्र दि.१३/८/२०१८ अन्वये अतिरीक्त प्राथमिक परिरक्षक म्हणून प्रादेशिक उप संचालक, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय, नगरपरिषद प्रशासन (सर्व) यांना व जिल्हा स्तरावर अतिरीक्त परिरक्षक म्हणून त्या-त्या जिल्ह्यातील जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. **(सोबत प्रत)**

**०२.** मुख्याधिकारी, गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यांकन अहवाल Mahapar प्रणालीत Online पध्दतीने लिहिण्याकरीता सर्व मुख्याधिकाऱ्यांचे वैयक्तीक nic.in/gov.in हे email ID असणे आवश्यक आहे. त्याकरीता जिल्ह्यातील संबंधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी नमूद तक्त्यामध्ये माहिती भरुन आपल्या स्तरावरुन तपासणी करुन संकलित माहिती १० दिवसांत संचालनालयास dmainfo5@gmail.com या ईमेलवर Excel Sheet मध्ये तसेच भरलेल्या माहितीची प्रत Scan Copy आपल्या स्वाक्षरीत प्रमाणित करुन पाठविण्याबाबत संदर्भाधीन क्र.३ येथील दि.५/११/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे. तथापि सदरची माहिती संचालनालयास अप्राप्त आहे.

**०३.** मुख्याधिकारी, गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यांकन अहवाल Mahapar प्रणालीत Online पध्दतीने लिहिण्याकरीता सर्व मुख्याधिकाऱ्यांचे वैयक्तीक nic.in/gov.in हे email ID असणे आवश्यक आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) आपल्या कार्यालयातील कार्यरत अधिकाऱ्यांचे तसेच आपल्या जिल्ह्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती मध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यांकन अहवाल Mahapar प्रणालीत Online पध्दतीने लिहिण्याकरीता ज्या अधिकाऱ्यांचे nic.in/gov.in email ID उपलब्ध आहेत. त्यांच्याबाबत खालील तक्यामध्ये माहिती भरुन सादर करावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांचे nic.in/gov.in email ID उपलब्ध नाहीत त्या अधिकाऱ्यांच्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि.१५/१२/२०१७ मधील परिशिष्ट-क नूसार nic.in/gov.in email ID प्राप्त करुन खालील तक्त्यात माहिती भरुन सादर करावी.

| अ.क्र | जिल्ह्याचे नांव | महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत नांव | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | मोबाईल क्रमांक | ईमेल आयडी (nic.in/gov.in email ID) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |